सिटी न्यूज

# विद्यापीठात क्वीक हील सायबर क्लब, सायबर सुरक्षेसाठी समाजप्रबोधन करणार

## कार्यक्रमात कुलगुरू डॉ. महानवर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती



सोलापूर विद्यापीठात क्वीक हिल सायबर क्लबच्या उद्‌घाटनाप्रसंगी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर आदी.

प्रतिनिधी | सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल व क्वीक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबवला जातो. या अंतर्गत विद्यापीठात सायबर क्लबचे उद्‌घाटन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली व क्वीक हिल फाऊंडेशनच्या प्रमुख अनुपमा काटकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

सध्याच्या डिजिटल युगात समाजामध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करणे हि काळाची गरज आहे व त्यासाठी विद्यापीठातील सायबर वॉरीयर्स प्रयत्न करतील असे कुलगुरू प्रा. महानवर यांनी सांगितले. या उपक्रमाव्दारे सायबर वॉरीयर्समध्ये व्यक्तिमत्वाचा विकास व संभाषण कौशल्यामध्ये सुधारणा होऊ शकते, असे मत क्वीक हिल फाउंडेशनचे अजय शिर्के यांनी मांडले. संकुलाचे संचालक प्रा. व्हि.बी. घुटे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले.

### आपली माहिती, आपली जबाबदारी

उपक्रमाद्वारे समाजातील विविध घटकांमध्ये सायबर गुन्हेविषयी माहिती दिली जाते. तसेच अशा प्रकारचे गुन्हे टाळण्यासाठी विविध उपाययोजना सेमीनारव्दारे सांगितले जाते. जसे की ओटीपी कोणास सांगू नये, स्ट्राँग पासवर्ड वापरावा, सोशल मीडियावर आलेले मेसेजेस व लींकची शहानिशा करावी व आपली माहिती, ही आपली जबाबदारी असे सांगितले जाते. क्वीक हिल फाऊंडेशनने या वर्षी हा उपक्रम राबवण्यासाठी ३० विद्यार्थ्यांची सायबर वॉरीयर्स म्हणून निवड केली आहे.

### क्लब पदाधिकाऱ्यांची निवड अशी

सायबर क्लब ऑफीसर्स म्हणून ४ विद्यार्थ्यांची निवड केली आहे. यात कु. मालती जाधव (प्रेसीडेंन्ट), कु. सायली शेळके (सेक्रेटरी) कु. शंकुतला बेल्ले (कम्युनिटी डायरेक्टर) व कु. सुप्रीया शिंदे (मीडिया डायरेक्टर) यांचा समावेश आहे.